**वाचले** :- या कार्यालयाची जाहिरात क्र. आस्थाप/मावक/2016/1/9/05, दि. 01/08/2016.

-------------------------------------------0000000000-------------------------------------------

क्र. आस्थाप/मावक/कावि/88/2016
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
दि. 13 /12/2016

**आदेश**

जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील रिक्त पदावर जिल्हा निवड समिती जळगांव यांनी गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केलेली आहे. निवड झालेल्या उमेदवारांची याद्वारे जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापेनवर वाहनचालक या पदावर वर्ग 3 संवर्गात (वेतनश्रेणी 5200-20200 अधिक ग्रेड पे 1900) खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात (On purely temporary & ad-hoc basis) नियुक्ती करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नांव व पत्ता** | **जाती संवर्ग** | **नियुक्ती दिलेले पद व कार्यालय** |
|---|---|---|---|
| 1 | **श्री. विष्णु पांडुरंग तायडे.<br>मु. अंभोडा पो. हतेडी बु.<br>ता. जि. बुलढाणा<br>पिन.** 443001 | इ.मा.व.<br>(स.आ.व्य.) | वाहन चालक, तहसिल कार्यालय,<br>भडगाव येथील रिक्त पदावर. |

**अटी व शर्ती :-**

1) वरील उमेदवाराची वाहनचालक या पदावर केलेली नेमणुक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता व कोणतेही कारण न दर्शविता शासन सेवेतून केव्हाही कमी करण्यांत येईल.

2) उमेदवारांनी या आदेशाचे दिनांकापासून 30 दिवसाचे आंत नेमणुकीचे पदावर रुजु होणे आवश्यक आहे. जर ते मुदतीत हजर झाले नाहीत तर त्यांची पदावर केलेली निवड व पदस्थापना रद्द झालेचे समजण्यात येईल.

3) नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी ते अन्यत्र नोकरी करीत असल्यास त्या पदाचा राजीनामा देणे आवश्यक आहे.

4) त्यांना सदर पदावर रुजू होतेवेळी भारतीय घटनेतील तरतूदीनुसार भारतीय संघराज्यांशी एकनिष्ठ राहाण्याबाबतची शपथ घ्यावी लागेल. तसेच शासन निर्णय राजकीय सेवा विभाग क्र.-1581/14 दि. 9/8/1979 अन्वये विहित केल्यानुसार वचननामा लिहून दयावा लागेल.

5) उच्चतम हिंदी किंवा मराठी तदर्थ् परीक्षा शासनाने विहित केलेल्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

6) प्रस्तुत पदावर रुजू होण्यासाठी त्यांना पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहाणार नाही.

7) जिल्हाधिकारी जळगांव यांच्या आस्थापनेवरील जळगांव जिल्हयात कोठेही असलेल्या कार्यालयात वाहनचालक पदावर त्यांची बदली होऊ शकेल.

8) त्यांनी वाहनचालक पदावर रुजू झालेनंतर एक महिन्याचे आत पूर्व चारित्र्य व वर्तणुकीबाबत पोलीस अधिक्षक तसेच जिल्हा शल्य चिकीत्सक जळगांव यांचेकडून वैद्यकीय दृष्टया पात्र असलेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

9) संबंधित कार्यालय प्रमुखांनी/शाखा प्रमुखांनी सदर उमेदवारांस रुजु करुन घेण्यासाठी त्यांचेकडून त्यांची जन्मतारीख, जात प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ कागदपत्रे तपासणी करुन घ्यावीत व तद्नंतरच त्यांना रुजु करुन घेण्यात यावे. संबंधित कार्यालय प्रमुख यांनी उमेदवार रुजु करुन घेतलेवर रुजु अहवालासह सर्व कागदपत्रांचा संच या कार्यालयाकडे सादर करावा.

10) उमेदवारांनी दिलेली माहिती, कागदपत्रे हे चुकीचे आढळुन आल्यास संबंधित उमेदवाराची निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल.

11) शासन निर्णय वित्त विभाग क्र-अंनियो-1005/126/सेवा-4 दि. 31/10/2005 नुसार उमेदवारांना परीभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहील आणि तसेच सदर उमेदवारांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) चे अंशराशीकरण नियम 1984 योजना लागु राहणार नाही. या संदर्भात शासनाचे काही निर्देश अगर सुचना प्राप्त झाल्यास ते सदर उमेदवार यांचेवर बंधनकारक राहतील.

12) रुजु झालेनंतर 15 दिवसाचे आंत विहित रकमेचे प्रतिभुती बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

13) वाहनचालक पदावर रुजु झालेनंतर शासकीय योजनेअंतर्गत कर्मचारी कपात झाल्यास तसेच शासन आदेशानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापनेवरील वाहनचालकाची पदे कमी झाल्यास सदर उमेदवार यांना कनिष्ठतम म्हणून ज्येष्ठतेनुसार सेवेतुन कमी करण्यात येईल. याबाबत कोणतीही पूर्वसूचना, नोटीस देण्यात येणार नाही. कोणत्या हरकतीची / कार्यवाहीची दखल न घेता कार्यवाही करण्यात येईल.

14) त्यांची प्रस्तुत नेमणूक ही शासन गोपनीय निर्णय सा.प्र.वि.क्र. व्हीसीए/1088/सीआर-36/16अ दिनांक 19/11/1990 नुसार त्यांचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य याबाबतच्या पडताळणी अहवालाचे अधिन राहून करण्यात येत आहे. याबाबत त्यांचेविरुध्द प्रतिकूल अहवाल आल्यास त्यांना सेवेतून कमी करण्यात येईल.

15) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 त्यांच्यावर बंधनकारक राहतील.

16) त्यांना वाहनचालक पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडे एक महीन्याची आगावू नोटीस दयावी अथवा एक महिन्याचे वेतन अगोदर सरकार जमा करावे लागेल.

17) प्रस्तुत पदावर रुजू झालेनंतर तीन महिन्याचे आत त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम आणि शासन निर्णय साप्रवि क्र सीआर-1076/2059/223/अकरा दि. 20/11/1980 नुसार विहीत केलेले मत्ता व दायीत्व (Assets & Liabilities) बाबतचे विवरणपत्र सादर करावे लागेल.

18) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील तरतुदीनुसार लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र भरुन देणे आवश्यक राहील.

19) कार्यालय प्रमुख / शाखा प्रमुख यांनी नेमणुकीचे पदावर उमेदवारास रुजु करुन घेण्यापूर्वी खालील नमुन्यात हमीपत्र घ्यावे. सदरचे हमीपत्र संबंधितांचे मूळ सेवापुस्तकात चिकटविण्यात यावे.

<u>हमीपत्र</u>

माझी जिल्हाधिकारी जळगांव यांचे आस्थापनेवर वाहनचालक या पदावर नेमणुक झालेली आहे. सदरची नेमणुक पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असून माझी सेवा मला पुर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल याची मला पूर्णतः जाणीव असून मी सदर नेमणुक स्विकारीत आहे.

**समक्ष** **उमेदवाराची सही व**

**दिनांक**

**कार्यालय प्रमुखाची सही व हुद्दा व दिनांक**

वरील सर्व अटींची पुर्तता संबंधित कार्यालय प्रमुख / शाखा प्रमुख यांनी करुन घेणे बंधनकारक असुन सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत संबंधित उमेदवार यांचेकडून हमीपत्रासह लेखी प्रतिज्ञापत्र एकाच स्टॅम्पवर करुन घ्यावे व अहवालासोबत इकडेस सादर करावे.

**जिल्हाधिकारी जळगांव**

COLLECTOR JALGAON जिल्हाधिकारी जळगांव

**प्रति,**
**श्री**----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

<u>प्रतिलिपी</u>

1. उपविभागीय अधिकारी ------------भाग-------------यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.
2. शाखा प्रमुख -----------/ तहसिलदार--------------यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.
3. जिल्हा कोषागार अधिकारी / उपकोषागार अधिकारी-------------यांना माहितीसाठी रवाना.
4. तहसिलदार (सर्वसाधारण) सामान्य शाखा जि. का. जळगांव यांना माहितीसाठी रवाना.
5. मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांना सविनय सादर.

**जिल्हाधिकारी जळगांव करीता**